.. .. नियमीत दिवाणी दावा क्र.१८७/२०१९

नि.क्र. ४४ सोबत

बालाजी गोणे वि. भारती सुर्यवंशी

**वादीकडून साक्षीदार क्रं.३ चा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.२ तर्फे अॅड.श्री.एल.एस.मधवरे यांच्या मार्फत सुरु–**

वादी बालाजी हा माझा नातेवाईक नाही. भारती यांच्या सोबत सुध्दा माझे नाते संबंध नाही. बालाजीचे घर माझ्या घराजवळ नाही. खरेदीखत करण्यापूर्वी भारती मॅडमने आठ–अ चा उतारा दाखविला होता. माझे घर माझे आईच्या नावावर आहे. मी आईच्या नावे असणाऱ्या जागेचा सर्वे क्रमांक सांगू शकत नाही. खरेदीपत्रातील मजकूर यांची सहानिशा आठ–अ च्या उता–या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कागदपत्रावरुन मी करुन घेतली नव्हती. सर्वे क्रं.६/१ अथवा ६ यांचे क्षेत्र निडेबन ग्रामपंचायतच्या क्षेत्रात येते की नगर परीषद उदगीर यांच्या क्षेत्रात येते हे मी सांगू शकत नाही. मी सुशिक्षीत असून पदवीधर झालेलो आहे. खरेदीखत होण्यापूर्वी मी जागेवर जावून क्षेत्र मोजून पाहिले नाही. मी खरेदीपत्रातील चतुःसीमाची खात्री जागेवर जावून केली नाही. मी प्लॉटच्या दोन बाजूला रस्ता असल्याचे पूर्वी पाहिले होते त्यामुळे त्याच्या इतर चतुःसीमा विषयी फार काही पडताळणी केली नाही. प्लॉट क्रं.२१ जे चतुःसीमेत नमुद केले आहे त्याचा त्यावेळी मुळ मालक कोण होते आणि आज कोण आहे हे मी सांगू शकत नाही. माझे प्रतिज्ञापत्रात जे मुल्याकंन नमुद केले आहे ती कोणी केले आहे ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या खरेदीपत्रावर सही केली त्या खरेदीपत्राचे मालक बालाजी गोणे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पैश्याचा व्यवहार माझे समक्ष झाला नाही. कोणत्या तारखेला पैशे दिले हे मला आठवत नाही. परंतू जून सन २००४ मध्ये पैसे दिल्याचे मला आठवते. पैसे दिल्याची पावती मी पाहिलेली नाही.

माझे समक्ष पैसे देण्यात आले असे खरेदीपत्रात नमुद करण्यास मी सांगीतले नव्हते. खरेदीपत्र करुन घेण्यासाठी काय कागदपत्राची

आवश्यकता असते याची विशेष माहिती मला नाही. मी सर्वे क्रमांकचे मंजूरी रेखाकंनपत्र पाहिले नाही. वादातील सर्वे क्रंमाकाचा व कृषीचा आदेश मी कधीही पाहिलेला नाही. मला गुंठेवारी बद्दल विशेष माहिती नाही. या मिळकतीची गुंठेवारी पाहिल्याचे आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले आहे.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.11.10 17:48:27 +0530

( श्री व्ही. आर. घराळ )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
उदगीर.

दिनांकः– १०.११.२०२५